“निर्गमित”

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये**
**दाखल झालेली तक्रार**
**रामाआ-तक्रार क्र.अम-४८/२०२१**

तक्रारकर्ता श्री.शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा.
मु.पो.प्रभात नगर, भोसा रोड, राजु किराणा जवळ, यवतमाळ, ता जि.यवतमाळ.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, कार्यालय, अमरावती, तिवसा भातकूली, चांदूर रेल्वे, मोर्शी, दर्यापूर, अचलपूर, धारणी.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी, महसुल, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती, ता.जि.अमरावती.

जन माहिती अधिकारी तथा तहसिल कार्यालय, अमरावती, तिवसा, चांदूर रेल्वे, मोर्शी, दर्यापूर, अचलपूर, धारणी, वरुड, नांदगांव, धामणगांव रेल्वे , चिखलदरा, चांदुर बाजार, भातकूली, अंजनगांव सुर्जी.

**तक्रार सुनावणी दिनांक- १६/०४/२०२१**

तक्रारकर्ता यांनी दि.२३/०२/२०२१ रोजी आयोगाचे स्तरावर कलम १८ (१)(ग) अन्वये तक्रार दाखल करुन, दि.२२/०१/२०२१ रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसाच्या विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही तसेच माहिती देखील पुरविली नाही, असे नमुद केले आहे. त्यामुळे संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द दंडात्मक/शास्तीची कारवाई करावी व तक्रारकर्ता यांना नुकसान भरपाई द्यावी असे निवेदन केले आहे.

प्रस्तुत तक्रारीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना सुनावणीसंबंधी ई-मेल द्वारे सुचनापत्र पाठवून दि.१६/०४/२०२१ रोजी ऑनलाईन सुनावणीकरीता बोलावले होते. त्यानुसार सुनावणीस तक्रारकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी श्री.गणेश म.संगारे, नायब तहसिलदार अचलपूर हे हजर आहेत.जन माहिती अधिकारी श्री.अक्षय मंडवे, नायब तहसिलदार, उप विभागीय कार्यालय, अचलपूर हे हजर आहेत.

तक्रारीची वस्तुस्थिती पाहिली असता असे निदर्शनास येते की, अपिलार्थीने केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२/०१/२०२१

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय अमरावती विभाग, अमरावती सत्यमेव जयते

रोजी रितसर माहितीचा अर्ज दाखल करुन, महाराष्ट्र आदिवासींना जमिनी प्रत्यर्पित करण्याचा अधिनियम, १९७४ च्या अंमलबजावणीचे अनुषंगाने निर्गत केलेल्या महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचे शासन परिपत्रक क्रमांकः आदिवासी-१००९/प्र.क्र.३२३/ल-९ दि.३१/०५/२०१२ नुसार संपुर्ण जिल्ह्यातील तालुका व गांव निहाय १ ते ८ मुद्यांवर झालेली कार्यवाही व त्यानुसार शासनास सादर केलेल्या मुळ नस्तीच्या छायांकीत प्रतीबाबतची माहिती तसेच परिपुर्ण किंवा कार्यवाही झाली नसल्यास त्यासाठी जबाबदार असलेल्या अधिकारी /कर्मचा-यांची नावे याबाबतची माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांचेकडून ३० दिवसाच्या विहीत मुदतीत माहितीचे प्रदान न झाल्याने तक्रारकर्त्याने आयोगाकडे तक्रार दाखल केल्याचे दिसून येते.

उत्तरवादी यांचा तोंडी व लेखी खुलासा व आजच्या गुगल मीट ॲपवरील ऑनलाईन सुनावणी मधुन असे निदर्शनास येते की, महाराष्ट्र विधीमंडळाने आदिवासीना जमिनी प्रत्यार्पित करण्याचा सन १९७४ चा अधिनियम पारित केला असून सदर अधिनियमानुसार सन १९५६ ते १९७४ या कालावधी दरम्यानचे ज्या आदिवासींच्या जमिनी गैर आदिवासीकडे हस्तांतरित झाल्या ते सगळे हस्तांतरन गैरकायदेशीर ठरवून त्या जमिनी आदिवासींना प्रत्यार्पित करावयाच्या होत्या. तथापि ३० वर्षाचा कालावधी पार पडून देखील सदर कायद्याची समाधानकारक अंमलबजावणी झालेली नव्हती. तसेच सन १९७४-७५ नंतर असे आदिवासी जमिनीचे गैर कायदेशीर हस्तांतरण थांबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महसूल जमिन अधिनियम, १९६६ चे कलम ३६ ला ३६ अ अशी सुधारणा करुन घेवून या नुसार सन १९७४ नंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगी शिवाय आदिवासीं जमीनीचे हस्तांतरण झाल्यास असे सर्व व्यवहार गैरकायदेशीर ठरवून अशा जमिनी पुन्हा आदिवासींना प्रत्यार्पित करण्याबाबतची तरतुद केलेली आहे. त्यानुसार महसूल यंत्रणेने वेळीच कार्यवाही करावयाची होती. तसेच १९७४ मध्ये अधिनियम पारित होऊन सन २००४ पर्यंत ३० वर्षेपूर्ण झाल्यावर त्याबाबतचा आढावा घेतला असता शासनाच्या असे निदर्शनास आले की, आज पर्यंत सदर कायद्याची योग्य अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे सदर कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी व्हावी या अपेक्षेने शासनाकडून सन २००६ मध्ये या कायद्याच्या अंमलबजावणी ला ३० वर्षाची मुदतवाढ देण्यात आली होती. सन २०१२ मध्ये जेव्हा आढावा घेतला तेव्हा शासनाच्या असे निदर्शनास आले की, कायद्याच्या अंमलबाजावणीला मुदतवाढ देऊन देखील जिल्हाधिकारी व त्यांचे अधिनस्त उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांचे स्तरावर काहीच घडत नाही व विभागीय आयुक्त स्तरावरून याबाबत कोणतेही सनियंत्रण होत नाही व आता सदर कायद्याची अंमलबजावणी करण्याचा कालावधी सन २०३६ पर्यत चालू राहणार आहे. परंतु सन २००६ मध्ये सदर मुदतवाढ मिळाली असली तरीदेखील महसूल यंत्रणेने सन २०१२ पर्यंत ६ वर्षाचा कालावधी काहीही करण्याशिवाय गमावला होता. आता यापुढील तरी उर्वरित १४ वर्षांमध्ये असे होऊ नये म्हणून दिनांक ३१ मे २०१२ रोजी शासन परिपत्रक क्रमांकः

आदिवासी-१००९/प्र.क्र.३२३/ल-९ निर्गत करुन त्यामधुन सदर कायद्याचे अंमलबजावणीचे अनुषंगाने जिल्हाधिकारी व त्यांचे अधिनस्त यंत्रणेने त्या त्या जिल्ह्यातील आदिवासी जमिनीच्या गैरकायदेशीर व्यवहाराची सर्व जमिन हस्तांतरण प्रकरणे हुडकवून काढुन महसुली प्रकरणे नोंदवावीत, वेळेत चालवावीत व अविलंब निकाली काढून आदिवासींच्या जमिनीचे प्रत्यर्पण करावे असे स्पष्टनिर्देश दिले होते. विभागीय आयुक्ताने देखील त्यांचे अधिनस्त जिल्हाधिकारी याबाबत किती गांभीर्याने काय कार्यवाही करत आहेत याचा वेळोवेळी जिल्हाधिकारी यांच्या मासिक बैठकीतून आढावा घेऊन सनियंत्रण करावे असे अभिप्रेत होते. मात्र सन २००६ पासुन आज १५ वर्षे होवून तसेच सदर परिपत्रक निर्गत झाल्यापासून ९ वर्षे होवून देखील काहीच होत नाही असे जेव्हा ऐखाद्या जागृत नागरिकाला वाटते आणि सार्वजनिक व्यापक जनहिताचा मुद्दा घेवून दि.२२/०१/२०२१ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे माहितीचा अर्ज टाकतो तर त्यांच्या माहितीच्या अर्जाची अशी वासलात काढल्या जाते. सदर माहितीचा अर्ज कलम ६(३) नुसार एकास एक प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात येतो. परंतु कलम ६(३) चा चुकीच्या पध्दतीने वापर करुन जन माहिती अधिकारी तथा तहसदिलार, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांनी सदर माहितीचा अर्ज जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालय तसेच सर्व तहसिल कार्यालयाकडे हस्तांतरित करुन जणुकाही सदरची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयाची नसून केवळ त्यांचे अधिनस्त प्राधिकरणाचीच आहे असे वाटाव ही फार गंभीर बाब आहे. तसेच शासनाद्वारे कोणतेही धोरण राबवितांना किंवा धोरणात्मक निर्णय घेतांना त्याबद्दल कालमर्यादा निश्चित केली जाते. परंतु उत्तरावादी यांचेकडून सदर परिपत्रकान्वये कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे आजच्या सुनावणीमधुन उत्तरवाद्यांचा खुलासा ही कार्यवाही सुरु असल्याबाबत तसेच आदिवासींचे जमिन हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरु असल्याबाबत सांगण्यात आले. वास्तविक ही कार्यवाही एका विशिष्ट कालमर्यादेत करुन संपुष्टात आणावयाची होती. परंतु उत्तरवादी यांनी ऐवढ्या महत्त्वाच्या विषयावर चालढकल करून पांघरुण घातले असल्याचे निदर्शनास येत आहे. नक्कीच तक्रारकर्त्याने मागितलेली माहिती ही व्यापक असली तरी ती व्यापक जनहित साध्य करणारी ठरत आहे. बहुतांश आदिवासी समाजबांधव हे अडाणी, अशिक्षित, अल्पशिक्षीत, व त्यांच्या मध्ये जागृतिचा अभाव असल्यामुळे गैर आदिवासींनी त्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेवून त्यांच्या शेकडो हेक्टर शेत जमिनी गैरकायदेशीरपणे ताब्यात घेतलेल्या आहेत. तसेच या संपुर्ण प्रक्रियेमध्ये महसूली अधिका-यांचा सक्रिय सहभाग दिसून येत आहे. अमरावती जिल्हा हा जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येच्या २१ % आदिवासी लोकसंख्या असलेला आदिवासी बहुल जिल्हा असून जिल्ह्यातील अमरावती, तिवसा, चांदूर रेल्वे, मोर्शी, दर्यापूर, अचलपूर, धारणी, वरुड, नांदगांव, धामणगांव रेल्वे , चिखलदरा, चांदुर बाजार, भातकूली, अंजनगांव सुर्जी येथे मोठ्या लोकसंख्येच्या आदिवासींचा निवास आहे. या तालुक्यात भारतीय घटनेचे तरतुदीनुसार जाहीर झालेले अनुसूचित क्षेत्र असून कोलाम जमाती

सारख्या आदिमजमातीच्या वस्त्या आहेत. येथे आदिवासी उपयोजनेचे स्वतंत्र नियोजन असून केंद्र सरकारकडून भारतीय घटनेचे कलम २७५ नुसार आदीवासिंच्या कल्याणकारी योजना राबविण्यासाठी विशेष निधी प्राप्त होतो. हे क्षेत्र पेसाकायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी निवडलेले आहे. आदिवासी जातच अबोल, घुमा, मुका आहे. त्याच्याकडे कोणतेही कसब, हरहुन्नरीपणा नाही. तो शक्य तोवर आपले राहिवासाचे ठिकाण सोडत नाही. स्थलांतरण करत नाही. तो जेथे जंगलात राहतो तेथील जमिनीवरील, गौण वनोपाज, क्षुनच गुजराण करतो. बहुतांश आदिवासींकडे जमिनी आहेत. मग ती वनपट्ट्याने प्राप्त झालेली, शासनाने १०६० च्या दशकात अन्नाची कमतरता भरून काढण्यासाठी अधिक धान्य पिकवा मोहीम राबवून इ वर्ग जमिनीचे पट्टे दिलेले जमिनी, भोगवटदार वर्ग १ च्या पूर्वापार पासून वडिलोपार्जित जमिनी आहेत. म्हणून जमीन ही आदिवासींची ओळख आहे. जमिनिविना आदिवासी म्हणजे पाण्याविना मासोळी अशीच त्याची गत होते. म्हणून सण १९७४ मध्ये, महाराष्ट्र आदिवासींना जमिनी प्रत्यर्पित करण्याचा अधिनियम, १९७४ महाराष्ट्र विधिमंडळाने पारित केला होता. तथापि, महसूल यंत्रणेकडून या कायद्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत नाही असेच आज पर्यंत निदर्शनास आले आहे. आदिवासींचे अज्ञान, धडसाचा अभाव, सरकारी यंत्रणेचे असहकार्य व कायदेशीर कार्यवाही अप्रमाणिक पना, याउलट ज्या गैर आदीवासीकडे आदिवासी जमिनीचा गैरकायदेशीरपने ताबा आहे त्यांची दंडेली, दहशत यामुळे देखील आदिवासी हक्क मागण्यासाठी, ताबा मिळविण्यासाठी पुढे येत नाहीत. महसुली यंत्रणा मुंग गिळून बसते. सन १९७५ ते १९८० च्या सदर कायद्याच्या प्राथमिक अंमलबजावणी कालावधीत अनेक आदिवासींचे खून झालेत. त्यामुळे देखील ते पोलीस ठाण्यात तक्रार करण्यास, तहसीलदाराकडे ताबा मागण्यासाठी, प्रकरण चालविण्यासाठी अर्ज देण्यासाठी समोर येण्याचे धाडसच करत नाहीत. म्हणून शासनाला कायद्याच्या अमलबजावणीला ३० वर्षाची मुदतवाढ देण्याची गरज भासते. मधून मधून आढावा घेऊन ३१ मे, २०२१ ला निर्गत केलेल्या परिपत्रकां सारखे स्थायी आदेश काढावे लागतात. तरीही महसूल यंत्रणेमध्ये या मुळेतसूतभर देखील फरक पडताना दिसत नाही. महसूल विभागीय आयुक्त यांना हा विषय त्यांच्या मासिक, द्विमासिक बैठकीच्या विषय सुचिवर सहजपणे समाविष्ट करता येऊ शकते. पण ते तसे करत नाहीत. महसूल व वन विभागाचे दिनांक ३१ मे, २०१२ चे स्थायी आदेश तसे फर्मावतात, तरी देखील याचा त्यांना विसर पडतो. कारण की आदिवासींचे कल्याण यांच्या विषयसुचिवर नाहीच. आदिवासी विकास विभाग सुद्धा या मध्ये हस्तक्षेप करू शकतो. पण आदिवासी विकास आयुक्त, त्यांचे अधिनस्त क्षेत्रीय स्तरावरील अप्पर आदिवासी विकास आयुक्त, प्रकल्प अधिकारी यांना याबाबत काहीही सोयर सुतक नाही. अन्यथा यांनी याबाबत महत्वाची भूमिका बजावली असती. आदिवासींच्या जमिनी वाचविणे, शाबूत ठेवणे, परत मिळविणे यासारखा आदिवासींचा विकास नाही. पण याबाबत आदिवासी विकास काहीही करत नाही. जिल्ह्याचे जिल्हाधिकारी देखील अतिरिक्त आदिवासी विकास आयुक्त असतात. आदिवासी

उपयोजनेची अंमलबजावणी ही त्यांचेच अध्यक्षते खाली होते. आदिवासींच्या जमिनी प्रत्यर्पण कायद्याची अंमलबजावणी ही देखील त्यांचेच अधिपत्या खाली होऊ शकते. प्रत्येक जिल्हाधिकारी कर्यालयात भुसुधारण शाखा असते. आदिवासींना जमिनी प्रत्यार्पित करण्याच्या कायद्याच्या अंमलबजावणीला विषय, हा कायदाच मुळी 'भुसुधारण' या विषयात समाविष्ट होत असल्यामुळे उपजिल्हाधिकारी (भुसुधार) यांचे करवी जिल्हाधिका-याने हाताळला पाहिजे. प्रत्येक मासिक सभेतून या कायद्याच्या अंमलबजावणीचा आढावा झाला पाहिजे. परंतु असे काहीही होतांना दिसत नाही. त्याचे कारण की याबाबत जिल्हाधिकारीच रुची घेत नाहीत. मग हा विषय मागे पडतो. वर्षा मागून वर्षे जातात. पण अंमलबजावणी शून्य दिसून येते. साधी सांख्यिकी जिल्हाधिकारी कार्यालयात दिसून येत नाही. उपविभागीय अधिकारी यांचे स्तरावर सुद्धा याबाबत आढावा होऊ शकतो. परंतु हा विषयच मुळी दुर्लक्षित असतो. तालुक्याचे तहसीलदाराची सदर कायदा अंमलबजावणीत थेट महत्वाची भूमिका आहे. महसूल विभाग गावपातळी पर्यंत प्रतिनिधित्व करतो. तलाठी व मंडळ अधिकारी थेट गावपातळीवर काम करणारे ग्रामस्तरीय अधिकारी आहेत. तलाठी हे दरवर्षी शेतीचे पेरे लिहितात. कोणत्या शेत गट नंबरचा मालक कोण आहे व त्याविरुद्ध नेमकी वहिती कोण करतो आहे याची प्रथम दर्शी माहिती तलाठी वर्गाला मिळते. तरीही काही होत असल्याचे दिसत नाही. तलाठी दफ्तर प्रमाणे तालाठ्याला ३० च्या आसपास गावनमुने ठेवावे लागतात. गावनमुना ७, ८ व त्याचे पोट नमुने ८ अ हे जड प्रमाणात लोकांच्या गरजेचे म्हणून ते तलाठी नियमित ठेवतात. परंतु गाव नमुना ७ ब हा नमुना विहित केलेला असूनही तलाठी दरवर्षी भरत नाहीत व ठेवतच नाहीत. ७ ब या नमुन्यात महात्म्य असे की, त्यामध्ये जमीन मालका शिवाय इतर कोणी व्यक्ती वहिती करत असेल तर त्याची नोंद घेण्याची सोय असते. यामुळे अनाधिकाराने वहिती करत असलेल्या व्यक्तीची माहिती सहजपणे संकलित होऊ शकते. तसेच तलाठ्यावर अशाबाबतीत अशा प्रकरणी तालुक्याचे तहसीलदारांना अहवाल देण्याचे एक महत्वाचे दायित्व असते. परंतु तलाठी अशी भूमिकाच बजावत नाहीत. मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार व तहसीलदार त्याबाबत कोणताही आढावा घेत नाहीत. जर तलाठ्याने ७ ब गाव नमुने अद्यावत ठेवला व अनाधिकाराने वाहितीची प्रकरणे तहसीलदारांना अहवाल देऊन कळविली तर आदिवासी जमिनीच्या प्रकरणाला वाचा फुटू शकते. परंतु असे होणे नाही असेच दिसते. मग तहसीलदार काय करतात, तर ते केवळ त्यांच्याकडे अर्ज दाखल केलेली प्रकरणेच चालवितात. आदिवासी पैकी फार कमी लोक अर्ज करतात. आजच्या घडीला पेरे लिहिण्याची पद्धत बदलली आहे. नमुना ७/१२ मध्ये केवळ पेरलेल्या पिकाचीच नोंद घेतल्या जाते. पूर्वी प्रमाणे वहिती कोण करत आहे याबाबत नोंदघेण्यात येत नाही. परंतु असे काहीही असले तरी ३१ मे, २०१२ च्या स्थायी आदेशानुसार जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांनी या कायद्याची

अंमलबजावणी करावयाची होती हे वास्तव त्यांना नाकारता येत नाही हे दिनांक ३१ मे, २०१२ च्या परिपत्रकांवये सदर कायद्याला मुदत वाढदिल्यावर निर्गत केलेल्या खालील सूचने वरून स्पष्ट होते.

१.जिल्हाधिकारी यांनी अशा प्रकरणाबाबत तात्काळ आढावा घेऊन अशी प्रकरणे निदर्शनास आल्या बरोबर व प्रलंबित असलेल्या प्रकरणात लगेच आदिवासी खातेदारांना कायद्यातील तरतुदीनुसार जमिनी प्रत्यर्पित करण्याची कार्यवाही सुरू करावी. अशी कार्यवाही सुरू करताना विशिष्ट कार्यक्रमाची आखणी करून, त्यातील १००% प्रकरणे विशिष्ट मुदतीत निकाली काढण्यात यावीत.

2. सदरहू प्रकरणे निकाली काढताना आदिवासी खातेदारावर कोणत्याही प्रकारे अन्याय होणार नाही याबाबत पूर्णपणे दक्षता घेण्यात यावी.

3. जिल्ह्यातील सर्व आदिवासी खातेदारास याकायद्या बाबत माहिती होईल अशा तऱ्हेने जिल्हा स्तरावर/तालुका स्तरावर/ग्रामपंचायत स्तरावर/तलाठी साझा, तसेच जिल्ह्यातील आदिवासी स्वयंसेवी संघटना, आदिवासी सहकारी संस्था येथे या सुधारणे बाबत आवश्यक ती प्रसिद्धी देऊन, आदिवासी खातेदारांना या तरतुदींची माहिती देण्यात यावी व त्यानुषंगाने मार्गदर्शन करण्यात यावे, त्यावर तहसीलदार/उपविभागीय अधिकारी यानी नियंत्रण ठेवावे.

४. उपरोक्त सर्व कार्यक्रमावर विभागीय आयुक्त यांनी नियंत्रण ठेऊन, त्याबाबत प्रत्येक महिन्याला आवश्यक त्या प्रकरणाचा निपटारा होतो किंवा कसे याबाबत खात्री करावी व त्याबाबत त्या विभागाचा मासिक अहवाल १) नोंदित प्रकरणे, २) आदेशीत प्रकरणे, ३) नाकारलेली प्रकरणे, ४) प्रत्यर्पित केलेल्या जमिनी, ५) ज्या आदिवासींना जमिनी प्रत्यर्पित केलेल्या आहेत त्या आदिवासींची संख्या, ६) प्रलंबित प्रकरणे, ७) प्रत्यर्पित करावयाच्या जमिनीचे क्षेत्र या नमुन्यात प्रत्येक महिन्याच्या १० तारखे पर्यंत प्राप्त होईल आशा रीतीने शासनाकडे पाठविण्यात यावा.

5. आदिवासी खातेदाराच्या जमिनीचे अवैध हस्तांतरण अथवा आदिवासींची कोणत्याही प्रकारे फसवणूक होणार नाही आणि महाराष्ट्र जमीन महसूल (जन जातीच्या व्यक्तीचे भोगधिकार जन जाती इतरांकडे हस्तांतरित करणे) नियम १९७५ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ३६ व ३६ अ तरतुदींचे काटेकोरपणे पालन होईल, याची जिल्हाधिकारी यांनी काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

६. ज्या ठीकानी आदिवासींच्या जमिनीवर कायद्यातील तरतुदीचा भंग करून अतिक्रमण/हस्तांतरण झाले असेल याबाबत जिल्हाधिकारी यांनी विशिष्ट मुदतीत शोध मोहीम

राबवून अशा जमिनी प्रत्यक्षात व कागदोपत्री आदिवासींच्या ताब्यात देण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

७. आदिवासी जमिनीच्या अनुषंगाने, शासन निर्णय क्र. लोआप्र-२००९/प्र. क्र.२३८/ल-६, दिनांक १७ मार्च, २०१२ अन्वये दिलेल्या सूचनांचा काटेकोरपणे अवलंब करावा.

8. या शासन परिपत्रकाच्या निर्गमित केल्याच्या दिनांका पासून दोन महिन्यांच्या आत विशिष्ट मोहीम राबवून आदिवासी खातेदाराच्या जमिनीच्या ७/१२ वर इतर हक्कसदरी "म.ज.म.अधिनियम, १९६६ चे कलम ३६ व ३६ अ ला पात्र" अशी नोंद तात्काळ घेण्यात यावी.

आजच्या सूनावणी मधून, वरील स्थायी आदेशातील सूचनांचे जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त व अधिनस्त तहसीलदार, उपविभागीय अधिकारी यांनी नऊ वर्षे कालावधी नंतरही पालन केलेले नाही ही बाब स्पष्ट होत आहे. जिल्हाधिका-याने विशिष्ट मुदतीत आदिवासींच्या जमिनी प्रत्यार्पित करण्याचा कार्यक्रम आखून कार्यवाही करून घ्यावयाची होती १००% प्रकरणे निकाली काढावयाची होती. असे करताना आदिवासी खातेदारावर कोणत्याही प्रकारे अन्याय होणार नाही असे पहायचे होते. अज्ञानी आदिवासींना या कायद्याच्या सुधारित तरतुदींची माहिती व्हावी म्हणून जिल्हा, तालुका व गावपातळी पर्यंत प्रसिद्धी कार्यक्रम राबवायचा होता. तसेच आदिवासी समाजिक संस्था, सहकारी संस्था यांना देखील या कायद्याच्या तरतुदी संबंधी माहिती द्यावयाची होती. विभागीय आयुक्तांनी जिल्हा स्तरावरील कार्यक्रमाची नीट अंमलबजावणी होत असल्याची खात्री करून सात स्तंभ असलेल्या विवरणात मासिक अहवाल शासनास ओठावायचा होता. जिल्हाधिका-यानी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३६ व ३६ अ च्यातरतुदींचे काटेकोरपणे पालन होते किंवा नाही याबाबत दक्षता घ्यावावयाची होती. आदिवासी जमिनीचे हस्तांतरण व अतिक्रमनाबाबत शोध मोहीम हाती घेऊन कठोरपणे जमिनी प्रत्यार्पण कार्यक्रम राबवायचा होता. याबाबत १७ मार्च २०१२ रोजी निर्गत केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावयाचे होते. आशा प्रत्यर्पित केलेल्या आदिवासी जमिनीची ७/१२ उताऱ्यावर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३६ अ अन्वये हस्तांतरणास प्रतिबंध अशी नोंद करावयाची होती. म्हणून तक्रारदार-अर्जदाराने आदिवासी कल्याणच्या विषयासंबंधी जिल्हाधिकारी बुलडाणा यांना माहिती मागितली असता, जन माहिती अधिकाऱ्याने कलम ६(१) नुसार तक्रारदार कडून प्राप्त झालेला माहितीचा अर्ज ३० दिवसाच्या कालमर्यादेचे पालन न करता दुर्लक्षित ठेवला व अशाप्रकारे कलम ७(१) चा भंग केला. जेव्हा तक्रारदार- माहिती अर्जदाराने कलम १९(१) नुसार प्रथम अपील अर्ज करण्या ऐवजी कलम १८(१) नुसार आयोगाकडे थेट तक्रार अर्ज दाखल केला तेव्हा जन माहिती अधिकाऱ्याने जणू काही सदर माहितीचा अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाला गैर लागू आहे अशा अविर्भावात कलम ६(३) चा गैरवापर

करून जिल्ह्यातील सर्व तहसीलदार व उपविभागीय अधिका-याकडे वर्ग केला. त्याऐवजी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या याकायद्याच्या अंमलबजावणीत काय भूमिका बजावली वा काहीही केले नसल्यास तसे सांगावयास पाहिजे होते. तथापि तसे काहीही केले नाही. सुनावणी दरम्यान उपस्थित असलेले तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांनी देखील सदर कायद्याच्या अंमलबजावणीबाबत अनभिज्ञता व्यक्त केली. अमरावती सारख्या अनुसूचित क्षेत्र, पेसा क्षेत्र, आदिवासी उपयोजना क्षेत्र, आदिमजमाती निवास क्षेत्र असलेल्या आदिवासी बहुल जिल्ह्यात या कायद्याच्या अंमलबजावणीची अत्यांतीक परवड होत असल्याचे स्पष्ट होत आहे. ज्या महसूल व वनविभागाने सदर स्थायी आदेश निर्गत केले त्यांना देखील सदर कायद्याच्या अमलबजावणीचा विसर पडलेला दिसून येतो. सचिव, आदिवासी विकास, विभाग, मंत्रालय मुंबई यांनी देखील सदर विषय वेळोवेळी संपन्न होणाऱ्या जनजाती सल्लागार परिषदेच्या बैठकीच्या विषयसुचिवर घेऊन या कायद्याच्या अंमलबजावणीला वाचा फोडली पाहिजे होती. विधिमंडळातील आदिवासी जन प्रतिनिधींना याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी कोणताही प्रसिद्धीचा कार्यक्रम राबविला नसल्यामुळे तटांच्याकडून या बाबत आग्रह दिसून येत नाही. अन्यथा जिल्हाधिकाऱ्यांनी ठप्प झालेल्या या कायद्याची अंमलबजावणी केली असती. आजही अमरावती सारख्या आदिवासी बहूल जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात शेकडो प्रकरणे अंमलबजावणीचा प्रतीक्षेत आहेत असे दिसून येते. सदर कायद्याच्या अंमलबजावणीत जिल्हाधिका-यांची महत्वाची भूमिका असताना त्यांनी व त्यांचे अधिनस्त यंत्रणेने काहीही केले नाही. म्हणून तक्रारदाराची तक्रार महत्वाची ठरते. महाराष्ट्र शासनाचे महसूल व वन विभागाने उक्त स्थायी आदेश निर्गत केल्यानंतर कोणताही पाठपुरावा केला नाही व सदर महत्वाचा व आदिवासींच्या कल्याणाचा विषयात दुर्लक्षितपणा सोडला असे ही दिसून येत आहे. या महसूल अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणाच्या भूमिकेने जिल्ह्यातील आदिवासी विकासावर अत्यंन्त दूरगामी परिणाम होत असून आदिवासी उपयोजनेचे अंदाजपत्रकानुसार प्राप्त होणाऱ्या व्यक्तिगत लाभाच्या योजनाचा निधी, भारतीय घटनेच्या कलम २७५ नुसार प्राप्त होणारा विशेष निधी याबाबतच्या खर्चावर प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ शकते. सबब, आयोग केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(१०) नुसार पुढील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. जिल्हाधिकारी, अमरावती यांनी सदर कायद्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेऊन शासनाच्या स्थायी आदेशानुसार आगामी २ महिन्यात तहसीलदार व उपविभागीय अधिकाऱ्यांकरावी गावपातळीवर मोहीम राबवून सर्व आदिवासी जमिनीचे हस्तांतरण व अतिक्रमण या सदरातील प्रकरणे हुडकून काढून ती नोंदवून घ्यावीत व निपटाऱ्याचा कार्यक्रम लावावा व तसे केल्याबाबत तहसील

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय
सत्यमेव जयते
अमरावती विभाग, अमरावती

निहाय माहिती तक्रारकर्ता-अर्जदार यांना दोन महिन्यात पुरवावी व तसे केल्याबाबत आयोगास पूर्तता अहवाल सादर करावा.

२. शासनाचे दिनांक ३१ मे, २०१२ चे स्थायी आदेशातील परिच्छेद ३ नुसार जिल्हाधिकारी, अमरावती यांनी आदिवासींची जाणीव व जागृती होऊन दावे दाखल करण्यासाठी प्रचार व प्रसिद्धी कार्यक्रम आखून तो तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांनी तलाठी व मंडळ अधिकारी यांचेकरवी गावपातळीवर राबवून घ्यावा व तसे केल्याचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करून माहितीचा भाग म्हणून कागदोपत्री पुराव्यासह तक्रारदारास देखील कळवावे.

३. २००६ पासून तर सण २०१२ व त्यानंतर आजतागायत तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांनी सदर कायद्याची अंमलबजावणी का केली नाही याबाबत संबंधितांना विचारणा करून संबंधितांना कोणत्या अडचणीना सामोरे जावे लागले याबाबत आढावा घेऊन त्या निस्तारण्याचा कार्यक्रम आखवावा अंमल करावा.

४. विभागीय आयुक्त अमरावती यांनी शासनाचे दि.३१ मे, २०१२ चे स्थायी आदेशातील परिच्छेद ४ नुसार शासनाने विहित केलेल्या नमुन्यातून प्रत्येक मागील महिन्याचा मासिक अहवाल दर पुढील महिन्याच्या १० तारखेला शासनास सादर करावा व तसे करत असल्याबाबत प्रत्येक महिन्याला आयोगास अवगत करावे.

५. जिल्हाधिकारी, वाशिम व विभागीय आयुक्त अमरावती यांनी आपल्या मासिकसभेच्या विषय सुचिवर हा विषय प्रधान्य क्रमावर ठेऊन दर महिन्याचे मासिक सभेतून याविषयावर गंभीर्य पूर्ण चर्चा करावी व ते इतिवृत्तांकीत करावे व तसे करत असल्याचा अहवाल इतिवृत्ताच्या पुराव्यासह आयोगास सादर करावा.

६. सचिव, आदिवासी विकास मंत्रालय मुंबई यांनी उपभोक्ता विभाग म्हणून सदर कायद्याच्या अंमलबजवणीत पाठ पुरावा करून सहभाग द्यावा व आगामी जनजाती सल्लागार परिषदेच्या विषय सुचिवर या विषयाला प्राधान्य क्रमाने स्थान देऊन यथावकाश चर्चा घडवून आणावी व तशा इतिवृत्ताच्या प्रतिसह अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

७. सदर कायद्याच्या अंमलबजावणीचे समन्वय, संनियंत्रण व मार्गदर्शन करणारा विभाग म्हणून महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांनी दिनांक १७ मार्च २०१२ व ३१ मे, २०१२ च्या निर्गत शासन परिपत्रकानुसार विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी सन २००६ नंतर आजतागायत आदेशीत करूनही अंमलबजावणीची कार्यवाही का पार पाडली नाही त्याबाबत जाब विचारून दि.३१ मे, २०१२ च्या परिपत्रकानुसार अविलंब अंमलबजावणी व्हावी म्हणून विशेष निर्देश द्यावेत व तशा निर्गत निर्देशाच्या प्रतीसह अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

८. केंद्रीय माहितीचा अधिकर अधिनियम, २००५ चे कलम १९(१०) नुसार राज्य माहिती आयोगाने पारित केलेला प्रत्येक आदेश कलम १९(७) नुसार संबंधित सार्वजनिक प्राधिकरणावर निर्धारित वेळेत अनुपालन करण्यासाठी अंतिम व बंधनकारक आहे. जर पारित आदेशाचे अनुपालन न करून अवमान केल्यास प्राधिकरणाचे संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १६६ नुसार फौजदारी कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

(संभाजी सरकुंडे)
**राज्य माहिती आयुक्त, अमरावती.**

जा.क्र.त. ४८/२०२१/ २३८२ /२०२१, दिनांक- १२/०७/२०२१

प्रतः -

१. जिल्हाधिकारी, अमरावती यांना पारित आदेशाचे अनुपालन करण्यासाठी देण्यात येते.
२.तहसीलदार(सर्व), जिल्हा अमरावती यांना कार्यवाहिस्तव देण्यात येते.
३. उपविभागीय अधिकारी (सर्व), जिल्हा अमरावती यांना योग्य कार्यवाहिस्तव देण्यात येते.
४. विभागीय आयुक्त अमरावती यांना पारित आदेशाचे अनुपालन करण्यासाठी देण्यात येते.
५. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना अनुपालनास्तव देण्यात येते.
६. सचिव, महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई-३२ यांना अनुपलनास्तव देण्यात येते.
७. अपील निवड नस्ती.

इंगळे/

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती